FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154203

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि, पहिली खबर क्र. FIR No. 84, वर्ष Year 2021, दिनांक Date 11/11/2021

2. (i) अधिनियम Act लाचलुचपत प्रतिबंधक, कलमे Sections ७,८
   (ii) अधिनियम Act अधि. १९८८, कलमे Sections
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day मंगळवार, तारीख पासून Date from 26/10/21 वेळ Time 10.00, तारीख पर्यंत Date to 11/11/2021 Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 26/10/2021, वेळ Time 13.00 वा
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 49/21, तारीख Date 11/11/21 वेळ Time 23.20 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. उत्तरेस २६ कि.मी., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name जिल्हा व तालुका, ठिकाणाचे नंबर No. if any पुरवठा, मुल्लूक Ward, रस्त्याचे नाव Name of Road नियंत्रक वैध मापन शास्त्र यांचे कार्यालय मुलुंड (प) मुंबई ८१
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, तालुका Taluka, जिल्हा Dist., राज्य State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ......, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाऱ्याचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. संतोषकुमार (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name जंगबहादूर सिंह
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ५६ वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8328867022
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. —, दिल्याचा दिनांक Date of Issue —, दिल्याचे ठिकाण Place of Issue —, (f) व्यवसाय Occupation व्यवसाय दुकान
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste —, जनजात Sub-Caste —
   (h) पत्ता Address साईनाथ वाडी, गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No. पवई चौक, फोन / मो. नं. Phone/Mo. No., पॅन नं. PAN No. कॉलनी, वोटर्स नं. Card No.
   रस्त्याचे नाव Road, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village मुलुंड, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.
   तालुका Taluka पंचरत्न, जिल्हा Dist. महाराष्ट्र, राज्य State मुलुंड (प), मुंबई, सध्याचा पत्ता Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
   1) विशाल आत्माराम मोहिरे वय 38 वर्षे धंदा - नोकरी रा.ठि. ठाणे (प)
   2) सोनिया पाटील धंदा - नोकरी रा.ठि. कल्याण



Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्री. सतिशकुमार जंगबहादुर सिंह वय ५८ वर्षे
धंदा- वजनकाटा दुकान, रा.ठी. साईनाथवाडी, पवईचौक, मुलुंड
कॉलनी, पंचरतन मंदीराजवळ, मुलुंड (प), मुंबई यांचा
स्वतंत्र पानावर जबाब नोंद करण्यात आला असून
त्यास नमुद गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल
संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(अजित झांजुर्णे)
पोलिस निरीक्षक
ला.प्र.वि., वरळी, मुंबई.

फिर्याद                    दिनांक :— ११/११/२०२१

श्री. सतिशकुमार जंगबहादूर सिंह, वय ५६ वर्षे, व्यवसाय — वजनकाटा दुरुस्ती व मुद्रांकन लायसन्स धारक रा.ठि. साईनाथवाडी, कैलासनाथ पांडे चाळ, पवई चौक, पंचरतन मंदिराजवळ, मुलुंड कॉलनी, मुलुंड (पश्चिम) , मुंबई, मो.क्र. ९३२४६४१०२२

मी वरीलप्रमाणे असून उपरोक्त नमुद पत्यावर माझे कुटुंबासह वास्तव्यास आहे. माझेकडे वजन काटा मापे दुरुस्ती व मुद्रांकन परवाना असून त्याद्वारे मी माझे वर नमुद राहते घरातूनच वजन/मापे/काटे दुरुस्तीचे काम करीत असतो. मी वजनकाटे मुद्रांकन व प्रमाणीकरण करीता असणाऱ्या शासकीय शुल्काचा महाराष्ट्र शासनाच्या पोर्टलवरुन वेळोवेळी ऑनलाईन भरणा करीत असतो.शुल्काचा ऑनलाईन भरणा केल्यानंतर माझेकडे उपलब्ध असलेले लायसन्स हे महाराष्ट्र राज्याकरीता असून मी माझ्याकडील परवान्याचे अनुषंगाने माझे भांडुप, मुलुंड व विक्रोळी येथील दुकानामध्ये जावुन तेथे असलेली वजन व मापे यांची तपासणी करुन त्यामध्ये नादुरुस्त असलेली वजन व मापांची दुरुस्ती करुन सदर दुरुस्ती झालेल्या वजन व मापांचे मुद्रांकन संबंधित निरीक्षक, वैद्यमापन शास्त्र भांडुप विभाग, मुलुंड विभाग, विक्रोळी विभाग यांचे मुलुंड येथील कार्यालयात जावून माझेकडे दुरुस्तीकरीता / प्रमाणिकरणाकरीता आलेल्या वजन/ काटयांचे मुद्रांकन करुन तसे प्रमाणपत्र वरील विभागाकडून प्राप्त करीत असतो.

दिनांक २२/०९/२०२१ रोजी मी नेहमी प्रमाणे ऑनलाईन शासकीय शुल्क भरुन मुलुंड विभागातील वजन काटे मुद्रांकीत व प्रमाणीत करण्यासाठी लोकसेवक विशाल भोईर, निरीक्षक, वैद्यमापन शास्त्र कार्यालय, मुंलुड विभाग यांचे कार्यालयात गेलो असता लोकसेवक भोईर यांनी शासकीय शुल्का व्यतिरिक्त प्रत्येक वजनी काट्या मागे रुपये ४००/— प्रमाणे लाचेची मागणी केली. परंतु मी महाराष्ट्र शासनाचे असणारे शुल्क ऑनलाईन पोर्टलद्वारे भरणा केलेले असल्याने लोकसेवक भोईर यांना माझी लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २८/०९/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून माझी तक्रार हिंदी भाषेत लिहून दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक झांजुर्णे यांनी त्यावर माझी सही घेतली व पो.नि. झांजुर्णे यांनी माझे तक्रार अर्जावर दिनांक २९/०९/२०२१ रोजी कारवाई करण्यात येईल असे सांगून मला दिनांक २९/०९/२०२१ रोजी सकाळी १०:०० वाजता ला.प्र.वि., मुंबई विभाग, वरळी, मुंबई येथील कार्यालयात हजर राहण्यास सांगितले.

पो.नि. झांजुर्णे यांनी सांगितल्याप्रमाणे मी दिनांक २९/०९/२०२१ रोजी ला.प्र.वि., मुंबई विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयात पो.नि. झांजुर्णे यांचेसमक्ष सकाळी १०:०० वाजता हजर झालो. सदर ठिकाणी पो. नि. झांजुर्णे यांनी त्यांचेसोबत उपस्थित असलेले दोन शासकीय पंच, पो.नि. देवकर व उर्वरीत पोलीस पथकाशी माझी ओळख करुन दिली. त्यानंतर पो.नि. झांजुर्णे यांनी उपस्थित पंचांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत समजावून सांगून मी दिनाक २८/०९/२०२१ रोजी दिलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. झांजुर्णे यांच्या सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही शासकीय पंचांनी स्वाक्षरी करुन व त्यानंतर पो.नि. झांजुर्णे यांनी स्वतः स्वाक्षरी करुन तक्रार अर्ज स्वतःच्या ताब्यात ठेवला. तदनंतर मी, दोन पंच व पो.नि. झांजुर्णे असे पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये गेलो. तेथे हजर पोलीस कर्मचारी याचे मदतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि. झांजुर्णे, यांनी स्वतःचे, माझे व पंचांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर पडताळणीकरीता आवश्यक बाबींची पुर्तता करुन मी, पो.नि. देवकर, पो.नि. झांजुर्णे, दोन शासकीय पंच व पोलीस पथक असे दोन शासकीय वाहनाने ला.प्र.वि.,वरळी, मुंबई कार्यालयातून बाहेर पडून मुलुंड पुर्व येथील छत्रपती संभाजी राजे मैदान, वीर सावरकर मार्ग, गेट क्र. १ येथे जावून थांबलो. त्यानंतर पो. नि. झांजुर्णे यांनी मला वैद्यमापन निरीक्षक श्री. विशाल भोईर यांना भेटण्याकरीता निरीक्षक वैद्यमापन शास्त्र, मुलुंड, भांडुप, विक्रोळी विभाग, गाळा क्र. ६, ७, ८ , निलसागर को.ऑ.हौ.सोसायटी, टाटा कॉलनी, नवघर

Scanned with OKEN Scanner

C.R.B.

रोड, मुलुंड (पुर्व ), मुंबई यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजिटल रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टाचे आतील बाजूस बनियानला लावून पंच श्री. येसणे यांचेसह माझे एन्टॉर्क कंपनीची मो/सा.क्रमांक **MH-03-CY-4565** वरुन पाठविले. मी पंचासोबत लोकसेवकाचे वर नमुद कार्यालयात गेलो असता सदर ठिकाणी लोकसेवक श्री. भोईर व त्यांचे सहाय्यक श्री. पाटील हे कार्यालयात हजर होते. त्यावेळी मी त्यांचेशी माझे कामासंदर्भात व वजन/मापे मुद्रांकन व प्रमाणपत्र यासंदर्भात चर्चा केली असता लोकसेवक श्री. भोईर यांनी प्रत्येक वजन काटयामागे रु. ४००/– याप्रमाणे लाचेची रक्कम द्यावी लागेल असे सांगितले. तसेच त्यांचे सहाय्यक श्री. पाटील यांनीदेखील नमुद प्रमाणे लाचेची मागणी केली. तसेच लोकसेवक भोईर यांनी **" जो रेग्युलर हैं उसका चारसौ "** असे बोलून स्पष्टपणे लाचेची मागणी केल्याचे दिसून आले. त्यावेळी मी त्यांना **" थोडा उसमे कम करोणा साब "** असे बोललो असता त्यांनी त्यास नकार दिला.

त्यानंतर मी ज्याठिकाणी पोलीस वाहन पार्क केले होते तेथे पंचासह परत आलो. पो.नि. झांजुर्णे यांनी व्हॉईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत मला व पंच श्री.येसणे यांना विचारुन व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये लोकसेवक भोईर व त्यांचे सहाय्यक पाटील यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पो.नि. झांजुर्णे यांनी सदरबाबत दिनांक ३०/०९/२०२१ रोजी सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगून माझे प्रमाणपत्र प्रलंबित असलेल्या एकूण २० वजनकाटया करीता प्रतिकाटा रु. ४००/– प्रमाणे एकूण रु. ८,०००/– ची व्यवस्था करुन दिनांक ३०/०९/२०२१ रोजी ला.प्र.वि. मुंबई विभाग, वरळी, मुंबई कार्यालयात हजर राहण्यास सांगितले.

त्याप्रमाणे मी दिनांक ३०/०९/२०२१ रोजी सकाळी पो.नि अजित झांजुर्णे यांनी दिलेल्या सुचनांनुसार रु. ८,०००/– रक्कम घेवून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, वरळी, मुंबई येथे आलो. त्यानंतर सापळापुर्व कारवाई पुर्ण करुन मी व पडताळणी कारवाई दरम्यान असणारे पोलीस पथक असे मुलुंड येथे शासकीय वाहनाने रवाना झालो. त्यानंतर पुर्व द्रुतगती महामार्ग, उत्तर वाहिनी, सर्विस रोड, मुलुंड, नवघर ब्रीजजवळ, थांबून मला व पंच श्री. येसणे यांच्यासह आवश्यक त्या सुचना देवून चालत रवाना केले. त्यानंतर मी लोकसेवक श्री. विशाल भोईर व त्यांचे सहाय्यक पाटील यांची भेट घेतली असता त्यांनी मला तुमच्या कामाचे नंतर बघू असे सांगून फोन केल्यानंतर ऑफिसला या असे सांगितल्याने मी परत पोलीस वाहन थांबले होते त्या ठिकाणी आलो व नमुद हकीकत मी व पंच श्री. येसणे यांनी पो.नि. झांजुर्णे व पो.नि. देवकर यांना सांगितली. त्यावेळी लोकसेवक बोलावतील तेव्हा सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येईल असे सांगून सदरची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.

मध्यंतरीच्या काळात आलोसे श्री. विशाल भोईर व त्यांचे सहाय्यक श्री. पाटील यांचेकडून मला कोणत्याही प्रकारे संपर्क साधण्यात आला नाही. परंतु दिनांक ०९/११/२०२१ रोजी मी श्री. विशाल भोईर यांचे कार्यालयात गेलो असता त्यांनी मला माझे राहिलेल्या व्यवहारासंबंधी बोलण्याकरीता दिनांक ११/११/२०२१ रोजी कार्यालयात येण्यास सांगितले. त्यामुळे मी दिनांक १०/११/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, वरळी, मुंबई येथे पो.नि. झांजुर्णे यांचे समक्ष हजर राहून त्यांना लोकसेवक श्री. विशाल भोईर यांनी मला दिनांक ११/११/२०२१ रोजी येवून राहिलेल्या व्यवहारासंबंधी बोलणी करण्याकरीता बोलाविले असल्याची माहिती दिली. त्यावेळी पो.नि. झांजुर्णे यांनी दिनांक ११/११/२०२१ रोजी सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येईल असे सांगून ला.प्र.वि. कार्यालयात लाचेच्या रक्कमेसह हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे मी, पो.नि. झांजुर्णे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे दिनांक ११/११/२०२१ रोजी सकाळी १०:०० वाजता मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, वरळी, मुंबई कार्यालयात हजर झालो व लोकसेवक श्री.भोईर यांनी माझे मोबाईलवर आज रोजी सकाळी व्हॉटस्ॲप कॉल करुन मला प्रतिकाटा रु. ४००/– प्रमाणे २०

समक्ष,
पो.नि. अजित झांजुर्णे

काटयांचे रु. ८,०००/— घेवून येण्यास सांगितले असल्याबाबत पो.नि. झांजुर्णे यांना माहिती दिली. त्याप्रमाणे मी लोकसेवक श्री. विशाल भोईर यांनी मागणी केलेप्रमाणे प्रति काटा रु. ४००/— असे एकूण २० काटयांचे रु.८०००/— रक्कम (५०० च्या १६ नोटा) घेवून आलो. सदर ५०० च्या नोटांना अँथ्रासिन पाऊडर लावून सदर नोटा माझे नेसणीस असलेल्या पॅटच्या मागील खिशात ठेवण्यात आल्या व पोलीस निरीक्षक अजित झांजुर्णे यांनी आवश्यक सुचना देवून मी, पो.नि. झांजुर्णे, पो.नि. देवकर, दोन शासकीय पंच व पोलीस पथकासोबत सरकारी वाहनाने लोकसेवक श्री. विशाल भोईर यांच्या मुलुंड येथील कार्यालयाचे दिशेने निघून छत्रपती संभाजी राजे मैदान, वीर सावरकर मार्ग, गेट क्र. १ येथे पोहोचलो.

त्यानंतर पो.नि. झांजुर्णे यांनी मला व पंच श्री. येसणे यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवून लोकसेवक श्री. विशाल भोईर यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर हाताने अंगठा दाखवून इशारा करण्याबाबत सांगितले. त्यानंतर पो.नि. झांजुर्णे यांनी माझे शर्टाचे आतील बाजूस बनियानला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावला. त्यानंतर मी व पंच श्री. येसणे असे माझ्या मो/ सायकल क्र. **MH-03-BN-8150** वरुन लोकसेवक श्री. विशाल भोईर यांचे कार्यालयात रवाना झालो.

लोकसेवक यांचे कार्यालयात पोहोचल्यानंतर पंच श्री. येसणे हे कार्यालयाबाहेर थांबून आमच्यात होणाऱ्या संभाषणावर व हालचालीवर लक्ष ठेवून थांबले. मी कार्यालयात गेल्यानंतर लोकसेवक भोईर यांच्या टेबलसमोरील खुर्चीवर बसून माझे कामासंबंधी बोलणी करुन मागणी केलेली रक्कम आणली असल्याचे सांगितले. त्यावर लोकसेवक श्री. भोईर यांनी सदर रक्कम टेबलवर ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी परिधान केलेल्या पॅटच्या मागील खिशात ठेवण्यात आलेल्या अँथ्रासिन पावडर लावलेली रक्कम रु. ८,०००/— माझ्या उजव्या हाताने काढून श्री. भोईर यांचेसमोरील टेबलवर ठेवली असता त्यांनी सदर रक्कम त्यांच्या उजव्या हाताने उचलून पांढऱ्या रंगाच्या कागदात गुंडाळून टेबलखाली असलेल्या काळया रंगाच्या बॅगेमध्ये ठेवली. त्यानंतर मी लोकसेवक यांच्या कार्यालयातून बाहेर येवून सापळा पथकाच्या दिशेने हाताने अंगठयांचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने लगेचच कार्यालयात धाड टाकून लोकसेवक विशाल भोईर यांना रंगेहात पकडले. तसेच पोलीस निरीक्षक अजित झांजुर्णे यांनी माझे शर्टाचे आतील बाजूस बनियानला लावलेला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर काढून तो त्यांच्या ताब्यात घेतला. तसेच विशाल भोईर याचे कडुन त्यांनी लाच म्हणुन स्विकारलेले रू. ८,०००/— पंचासमक्ष हस्तगत केले.

तरी दिनांक २९/०९/२०२१ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री. विशाल भोईर, निरीक्षक, वैद्यमापनशास्त्र, मुलुंड विभाग, मुंबई व श्री. सतिश पाटील, क्षेत्रसहाय्यक, वैद्यमापनशास्त्र, मुलुंड विभाग, मुंबई यांनी वजन/काटे मुद्रांकन व प्रमाणपत्राकरीता शासकीय शुल्काखेरीज प्रतिकाटा रु. ४००/— प्रमाणे लाचेची मागणी केली व दिनांक ११/११/२०२१ रोजी माझे मुद्रांकन व प्रमाणिकरणाकरीता प्रलंबित असलेल्या एकूण २० वजनी काटयाकरीता प्रतिकाटा रु. ४००/— प्रमाणे रु. ८,०००/— इतकी लाचेची रक्कम लोकसेवक श्री. विशाल भोईर यांनी कायदेशीर परिश्रमाखेरीज स्वत:च्या फायद्याकरीता पारितोषण म्हणुन स्विकारली म्हणुन माझी दोन्ही विरूध्द फिर्याद आहे. ,

माझा जबाब संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहीला, तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( अजित झांजुर्णे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............. तात्काळ .............

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.............................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...... १) लाचेची रक्कम रु. ८०००/-

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) २) आलोसे यांच्या कार्यालयीन झडतीत मिळालेली

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ...... रोख रक्कम रु. ४६,०००/- ......

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आलोसे यांनी शासनमान्य परवाना धारक फिर्यादी यांना त्यांनी वाहनकाटे मुद्रांकन व प्रमाणितकरणाचे शासकीय शुल्क ऑनलाईन भरल्याचे प्रत्येक वाहनकाट्यामागे रु. ४००/- लाचेची मागणी दि. 28/09/24 रोजी आलोसे १ व 2 यांनी केली व आज रोजी फिर्यादीकडे कायदेशीर परिश्रमाखेरीज स्वतःच्या फायद्याकरीता रु. ८०००/- घेताना आलोसे क्र. १ यांना रंगेहाथ पकडले म्हणून आलोसे क्र. १ व 2 यांच्या विरुद्ध लाप्रकाअ १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद.

.............................................................................................

13. **केलेली कार्यवाही –** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ...... पो.नि. अजित आगुर्डे ......

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

.............................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..................., जिल्हा ..................., राज्य ...................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank............... No............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ................................................ District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...... अजित आगुर्डे ......

पदनाम Rank...... पोलीस निरीक्षक ......

तपासिक अं. चा कोड क्र. ...... ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ..............................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख...................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner